# प्रकरण ४.
# १८५७ चा उठाव

## ❖ १८५७ च्या उठावाची पार्श्वभूमी



- १८५७ च्या राष्ट्रीय उठावाचे तत्कालीन कारण चरबीयुक्त काडतुसाची सक्ती हे जरी असले तरी या उठावाची पार्श्वभूमी बरीच वर्षे अगोदरची असल्याचे दिसते.
- ब्रिटिश सत्तेने व्यापार व राज्यकारभार करताना १७५७ पासून ते १८५७ पर्यंत (१०० वर्ष) भारतीयांचे आर्थिक शोषण केले. धार्मिक बाबतीत हस्तक्षेप तसेच राजकीय हस्तक्षेप करून भारतीय जनतेला गुलामगिरीत जखडून टाकले.
- कॉर्नवॉलिसच्या काळात सक्तीचा शेतसारा इंग्रजांनी भारतीय समाजामध्ये असणाऱ्या रुढी, परंपरा, अंधश्रद्धा यामध्ये हस्तक्षेप केला. त्यामुळे भारतीय समाजामध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली. त्यांनी भारतात काळा-गोरा भेद निर्माण केला.
- लॉर्ड डलहौसीचे विस्तारवादी धोरण (संस्थानिक खालसा) यामुळे हिंदी संस्थानिक ब्रिटिशांच्या विरोधात बंड करून उभे राहिले. यातूनच १८५७ चा उठाव झाला.

### १८५७ पूर्वीचे लष्करी बंड

- १८०६ चे वेल्लोर बंड :- हिंदी सैनिकातील पहिले बंड
- १८२४ चे बराकपूर बंड
- १८२७ चे नागपूर बंड
- १८२९ चे हिंदुस्थानातील पूर्व भागात खासी टेकडीवरील आदिवासी बंड
- १८३१ पर्यंतचे उमाजी नाईकांचे बंड
- १८३१-३४ चे मुंडा अदिवासी बंड

## १८५७ च्या उठावाची विविध कारणे

### राजकीय कारणे

- लॉर्ड वेलस्ली, लॉर्ड हेस्टिंग्ज यांनी विस्तारवादी धोरणांचा अवलंब केला.
- १७९८ मध्ये वेलस्लीने तैनाती फौजेचा अवलंब करून लष्करीदृष्ट्या हिंदुस्थानावर कब्जा केला.
- मोगल बादशाह बहादूर शहाचा बादशाह हा किताब व पेंशन रद्द केली.
- पेशवा दुसरा बाजीराव याचा दत्तक पुत्र नाना साहेब पेशवा याला मिळणारे पेंशन डलहौसीने बंद करून वऱ्हाड (विदर्भ) आपल्या ताब्यात घेतला.
- अनेक जहागिरदारांच्या जहागींऱ्या जप्त केल्या.
- २१००० इनामी जप्त केली.



लॉर्ड वेलस्ली



लॉर्ड हेस्टिंग्ज

### १. तैनाती फौजेच्या पध्दतीचे दुष्परिणाम



वॉरन् हेस्टिंग

- आपले साम्राज्य उभे करताना इंग्रजांनी ‘फोडा आणि राज्य करा’ या तत्त्वाचा नेहमीच अवलंब केला. क्लाईव्ह, वॉरन् हेस्टिंगसारख्या अधिकाऱ्यांनी नीती-अनीती याचा फारसा विधिनिषेध पाळला नाही. त्यातच इंग्रजांची भेदनीती, त्यांच्या व्यापारी साम्राज्यवाद, त्यांची शस्त्रास्त्रे व संस्कृतीचे सामर्थ्य यांचे रहस्य अनेक हिंदी राजेराजवाडयांना उमजूनच आले नाही.

- आपापसातील हेवेदावे व सुखविलासीन वृत्ती यामुळे त्यांचा ऱ्हास अधिक झपाट्याने झाला. त्यांच्यापैकी अनेकांचे प्रदेश कंपनी सरकारने आपल्या ताब्यात आणले. त्यांची परराष्ट्रीय धोरणे इंग्रज ठरवू लागले.
- युध्द व शांतता प्रस्थापित करण्यात राज्यकर्त्यांचा प्रमुख अधिकार त्यांच्याकडून इंग्रजांनी आपल्याकडे घेतला. लॉर्ड वेलस्लीच्या 'तैनाती फौजेच्या पध्दतीने' वर सांगितलेली ही अवस्था अनेक हिंदी सत्ताधीशांच्या नशिबी आली.
- त्यामध्ये हैद्राबादचा पहिला निजाम (१७९८), टिपू सुलतान (१७९९), अवधचा (औंध) नबाब (१८००), मराठे शिंदे, होळकर, भोसले हे सरदार, इत्यादी सत्ताधीश प्रमुख होते. तैनाती फौजेच्या पध्दतीमध्ये या इंग्रज फौजेचा खर्च हिंदी राजांनी करावयाचा व त्या फौजेवर हुकुमत गाजवायची मात्र इंग्रजांनी, असा वेलस्लीचा मुत्सद्दी डाव होता.



लॉर्ड वेलस्ली

- तैनाती फौजेच्या प्रभावाखाली हे हिंदी राजे गेल्यामुळे ते दुबळे बनले, त्यांच्या ठिकाणची पराक्रमाची परंपरा लुप्त झाली. इंग्रजांनीच त्यांच्या संरक्षणाची बाजू स्वीकारल्याने ते आपल्या राज्यांच्या कारभाराकडे दुर्लक्ष करु लागले. परिणामी त्यांची कारभार यंत्रणा मोडकळीस येऊन त्यांच्या राज्यात अशांतता व अव्यवस्था निर्माण होऊ लागली.

## २. डलहौसीचे आक्रमक साम्राज्यवादी धोरण



लॉर्ड डलहौसी

- परिणामी पुढे लॉर्ड डलहौसीसारख्या इंग्रज राज्यकर्त्याला असे वाटू लागले की, गैरकारभार असणारी राज्ये कशासाठी जगू द्यावी? ती खालसा करणेच योग्य होय. असे झाले की सर्व हिंदुस्थान एकछत्री अंमलाखाली येईल आणि सर्वत्र सुव्यवस्था स्थापन करता येईल.
- युध्दमार्गाचा अवलंब करुन त्याने १८४९ साली शीखांचा पराभव केला व त्यांचे राज्य जिंकले, तर १८५२ साली ब्रह्मदेशाशी युध्द करुन त्याने दक्षिण ब्रह्मदेश इंग्रज साम्राज्यात विलीन केला. याशिवाय या ना त्या कारणाखाली त्याने अनेक हिंदी राज्ये खालसा केली व इंग्रजी राज्याला जोडून टाकली.
- निपुत्रिक राजेरजवाडयांनी आपल्या वारसासाठी कंपनी सरकारची पूर्व-संमती घेणे आवश्यक आहे, हे त्याला स्पष्ट करावयाचे होते. पूर्वी १८४४ सालीच कंपनीच्या डायरेक्टरांनीच हे तत्त्व घोषित केले होते. तथापि त्याची अंमलबजावणी कोणी केली नव्हती. इंग्रजी साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी डलहौसीला मात्र या तत्त्वाने मोठी संधी प्राप्त करुन दिली.
- इ.स.१८४८ साली साताराचे (प्रतापसिंह भोसले) छत्रपती निपुत्रिक मरण पावले. मृत्यूपूर्वी त्यांनी घेतलेला दत्तक डलहौसीने नामंजूर केला. आणि साताराचे राज्य खालसा करुन टाकले. अशाच प्रकारे १८५३ साली नागपूरचा राजा निपुत्रिक म्हणून मरण पावला.
- त्याच्या राणीने घेतलेला दत्तक-वारसही डलहौसीने 'नामंजूर' म्हणून घोषित केला. परिणामी नागपूरचे राज्य खालसा होऊन इंग्रजी साम्राज्यात ज्या तत्त्वानुसार विलीन केले ते तत्त्व फार जुने असले तरी अनुकरणीय खास नव्हते. बळी तो कान पिळी हेच ते तत्त्व होते.
- 'इतिहास प्रसिध्द' झाशीची राणी १८५३ मध्ये विधवा झाली. पतीच्या मृत्यूपूर्वी तिने दत्तक पुत्र घेतला होता. हा दत्तक पुत्र वारस म्हणून नामंजूर करुन डलहौसीने तिचे राज्य खालसा केले. अशाच प्रकारे या तत्त्वाचा वापर करुन त्याने 'संबलपूर, जैतपूर, भगत व उदयपूर' ही राज्ये खालसा केली व त्यांचा प्रदेश आपल्या साम्राज्यात विलीन करुन टाकला.
- याशिवाय तैनाती फौजेची बाकी वसूल करण्याचे निमित्त पुढे करुन डलहौसीने हैद्राबादच्या निजामाकडून त्याचा वऱ्हाड प्रांत घेतला. (१८५३) तसेच गैरकारभार व अव्यवस्था या कारणाखाली औंधच्या (अयोध्या) नबाबाचे राज्य खालसा करण्यात आले (१८५६).



झाशीची राणी

- डलहौसी एवढयावरच थांबला नाही. त्याने अनेक राजेरजवाडयांच्या पदव्या व तनखे बंद करुन टाकले. पदव्या अथवा तनखे या गोष्टी वंशपरंपरेने चालत नसतात, असे त्यांचे मत होते. त्यानुसार त्याने १८५२ साली दुसऱ्या बाजीरावाच्या मृत्यूनंतर त्याचा दत्तक पुत्र नानासाहेब पेशवा याचा वारसाहक्क नामंजूर केला व त्यास मिळू शकणारा आठ लाखाचा तनखाही बंद केला. त्याला प्राप्त होणारी 'पेशवा' ही पदवी आता नाममात्र होती, पण तीही त्याला देण्यात आली नाही. १८५५ साली तंजावरचा राजा मृत्यू पावला. त्याच्या वारसदाराची जहांगीर व तनखा या बाबी डलहौसीने जप्त केल्या.
- अधिकार व संपत्ती या गोष्टी त्याला केव्हाच सोडून गेल्या होत्या. तोही इंग्रजीच्या तडाख्यातून सुटला नाही. 'तो मेल्यावर नंतर बनणाऱ्या मोगल बादशहाला मोगल सम्राटाच्या राजवाडयात राहता येणार नाही' असे त्यांनी त्याला बजावले होते.'
- डलहौसीच्या या आक्रमक व अन्यायी धोरणामुळे हिंदी राजेरजवाडे हवालदिल बनले. इंग्रज इतिहासकार पी.ई. रॉबर्ट म्हणतो. 'डलहौसीच्या विदेशनीतीमध्ये सत्यांश कितीही असो, एक गोष्ट मात्र खरी की, या नीतीमुळे सर्व हिंदी संस्थानिकांना वाटू लागले की आपली संस्थाने मोठया धोक्यात आहेत.
- 'याशिवाय सातारा (१८४८), संबळपूर - जैतापूर (१८४९), अवध (१८५६) झांसी (१८५३), नागपुर (१८५४), उदयपूर ही राज्ये खालसा केल्याने हिंदू प्रजेच्या भावना दुखावल्या, तर अवधच्या नबाबाचे राज्य नष्ट झाल्याने व मोगल बादशहाला निर्माल्यवत बनविल्याने मुसलमान दुखावले गेले.

- नीती-अनीती यांची चाड न बाळगता इंग्रजांना हिंदुस्थानातील सर्व राज्ये खालसा करावयाची आहेत, असेच सर्वसामान्य माणसांना वाटू लागले. या सुमारास कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांच्या ठिकाणी केवढा आक्रमक साम्राज्यवाद वसत होता, याची साक्ष त्या वेळचा इंग्रज सेनापती नेपियरचे उद्‌गार देतील.
- तंजावदचा राजा व कर्नाटकाचा नवाब यांच्या शाही उपाद्या बंद केल्या. म्हैसुरचा राजा व नाना साहेब पेशवे यांचे वेतन रद्द करण्यात आले.
- या आक्रमक धोरणाविरुध्द आपली प्रतिक्रिया नोंदवताना लुडलॉ हा लेखक म्हणतो, ‘या परिस्थितीत हिंदी लोकांच्या भावना खालसी धोरणाला बळी पडलेल्याच्या मागे उभा राहिल्या नसत्या व इंग्रजांच्या विरुध्द गेल्या नसत्या तर हिंदी लोक मनुष्यत्वाला पात्र राहिले नसते.’

**‘मी जर का १२ वर्षासाठी हिंदुस्थानचा बादशहा झालो, तर हिंदुस्थानात एकही संस्थानिक नावाला राहणार नाही. हैद्राबादचा निजाम इतिहासजमा होईल व नेपाळ इंग्रजांचे बनेल.’ - नेपियर**

## सामाजिक कारणे :-

### १. हिंदी लोकांना रानटी समजले जाई

- इंग्रज हिंदुस्थानचे राज्यकर्ते बनल्यावर त्यांच्या ठिकाणी असणारा संस्कृती श्रेष्ठत्वाचा गंड हिंदी लोकांच्या लक्षात येऊ लागला. इंग्रज केवळ आपली संस्कृतीच श्रेष्ठ मानीत असे नव्हे, तर हिंदी संस्कृतीला रानटी संस्कृती व हिंदी लोकांना रानटी माणसे संबोधीत असे.





लॉर्ड वेलस्ली

- १७८४ साली वॉरन हेस्टिंग्जनेसुध्दा इंग्रजांच्या या तुच्छ भावनेविषयी स्पष्ट कबुली दिली आहे. हिंदी माणसे रानटी असून युरोपातील सर्वात मागासलेल्या देशातील सर्वात मागासलेल्या माणसांची सुध्दा ती बरोबरी करु शकणार नाहीत, अशी दर्पोक्ती इंग्रज अधिकारी करत.
- स्वाभाविकच राज्यकर्ते व प्रजा यांच्यामध्ये तुच्छतेची दरी निर्माण झाली होती. राज्यकर्ते स्वत: प्रजेपासून फटकून वागत असल्याने ही दरी कधी कमी होऊ शकली नाही. परिणामी, राज्यकर्त्याबद्दल प्रजेला आपलेपणा न वाटता त्यांच्यात असंतोष निर्माण झाला.

### २. हिंदू संस्कृतीवर संकट आल्याची भावना

- लॉर्ड बेंटिक, लॉर्ड डलहौसी यांसारख्या काही सुधारणावादी इंग्रज राज्यकर्त्यांनी कायदे करुन हिंदी समाजात सुधारणा घडविण्याचा प्रयत्न केला. उदा. ‘सतीबंदी कायदा’, ‘बालविवाहप्रतिबंधक कायदा’, विधवा पुनर्विवाह संमती कायदा इत्यादी. ह्या कायद्यामागची राज्यकर्त्यांची भूमिका योग्य होती.
- पण सामान्य लोकांना त्यामुळे आपल्या समाजाची चौकटच नष्ट होत आहे, असे वाटू लागले. विधवांच्या पुनर्विवाहाला आजही जेवढी पाहिजे तेवढी सामाजिक मान्यता मिळत नाही, यावरुन त्याकाळी इंग्रजांनी जेव्हा कायद्याने अशी मान्यता दिली असेल, तेव्हा समाजाच्या भावना किती प्रक्षुब्द झाल्या असतील, याची आपण कल्पना करु शकतो.
- १८२९ चा सती बंदीचा कायदा व १८५० चा जातीभेद निर्मूलन कायद्यानुसार वारसा हक्कात व मालमत्ता हक्कात बदल केले.
- हिंदुस्थानातील पारंपरिक धर्मशास्त्रांचा अभ्यास, संस्कृत, अरबी, फारसी भाषांचे अध्ययन इत्यादी बाबी इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे कमी महत्वाच्या बनूण मागे पडू लागल्या. राज्यकर्त्यांचेही अशा परंपरागत विद्याभ्यासाला उत्तेजन मिळणे बंद झाले.पूर्वी राज्यकारभारची भाषा ‘फारसी’ होती. आता तिची जागा इंग्रजाने घेतली. आता इंग्रजी शिक्षण घेणाऱ्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळू लागली. त्यामुळे हिंदी समाजात आतापर्यंत प्रतिष्ठा व वजन असणारा हिंदू पंडितांचा व मुसलमान मौलवींचा वर्ग असंतुष्ट बनला.

### ३. हजारो सरंजामदार व सैनिक बेकार बनले



- इंग्रजांनी हजारो सरंजामदारांना त्यांच्या पदव्यांपासून त्याच्या जहागिऱ्यांपासून आणि हक्कांपासून वंचित केले. फक्त मुंबई प्रांतातच २० हजार इनामदारांची इनामे जप्त केली गेली होती.
- औंध राज्यातील कमिश्नर जॅक्सनने शेकडो तालुकेदारांच्या जमीनदारांच्या (इस्टेटी) खालसा केल्या. एवढेच नव्हे तर जमीनदारांनाही ‘दत्तक वारसा नामंजूर’ हे तत्त्व लागू करण्यात आले. सरकारी अधिकारी कोर्टाचे निर्णयही धाब्यावर बसवत.

- मनीपूरच्या राजाची ११३ खेडयांची जहागीर अशीच अन्यायाने जप्त केली होती. जहागिरी व हक्क गेल्यामुळे या सरंजामदारांची सामाजिक प्रतिष्ठा लयाला गेली. त्यांचे हजारो आश्रित उघडयावर पडले.
- तसेच अनेक लहान-मोठी हिंदी राज्ये खालसा झाल्यामुळे त्या राज्यातील हजारो सैनिक व नोकर-चाकर आपल्या चाकरीस मुकले. त्यांच्या बेकारीमुळे औंधसारख्या राज्यात मोठा सामाजिक असंतोष निर्माण झाला.

## ४. शिक्षण पद्धती :-

- ब्रिटिशांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरु करून भारतीय समाजाची, संस्कृतीची व पौर्वात्य शिक्षणाची पिछेहाट केली.

# आर्थिक कारणे :-

## १. देशी उद्योगधंद्यांचा ऱ्हास



- आर्थिक साम्राज्यवादावर भर देऊन भारतातले पारंपारिक उद्योग किंवा हस्त व कलाकुसरीचे उद्योग बंद पाडले.
- इंग्रजांचा साम्राज्यवाद हा आर्थिक साम्राज्यवाद होता. हिंदुस्थानमधून कराच्या रुपाने अथवा व्यापाराच्या रुपाने जास्तीत जास्त संपत्ती मायदेशी नेणे, हेच त्याचे मुख्य उद्दिष्ट होते. हे उद्दिष्ट साध्य करण्यात ते पूर्ण यशस्वी झाले.


### ❑ इंग्रजी भांडवलदारांकडून होणारी पिळवणूक



- हिंदुस्थानच्या अनेक प्रदेशांवर त्यांची मालकी प्रस्थापित होताच, ते मनमानी व्यापार करु लागले. येथील बाजारातील हिंदी माल त्यांच्या यंत्रावर तयार होणाऱ्या मालाशी स्पर्धा करु शकला नाही. परिणामी हिंदुस्थानातील पंरपरागत हस्तव्यवसाय व कलाकुसरीचे धंदे बुडाले. त्यामधील कारागीर शेतीकडे वळाले. सर्वत्र मोठी बेकारी व असंतोष निर्माण झाला
- शेतकऱ्यांच्या उत्पन्नाच्या दोन तृतीयांश कर ब्रिटिश शासनाला द्यावा लागत.
- त्यामुळे इंग्रजांचा व्यापार वाढला, कारखानदारी वाढली. परिणामी भांडवल वाढले. हे भांडवल हिंदुस्थानमधील अनेक उद्योगधंद्यात इंग्रज व्यापाऱ्यांनी गुंतविले. पण या भांडवलावर होणारा फायदा ते मायदेशी नेत असल्याने हिंदुस्थान दरिद्रीच राहिला.

**'इंग्रजी भांडवलाचा हिंदुस्थानात ओघ येत राहिला, पण या भांडवल गुंतवणुकीतील व्याज व फायदा इंग्लंडला जात असल्याने, त्याचे हानिकारक परिणाम घडून आले. हिंदुस्थान म्हणजे एक दुभती गाय बनली की जिचे दुध इंग्लंड पीत होते, पण तिची लेकरे मात्र उपासमारीने तडफडत होती.' - डॉ. ईश्वरी प्रसाद**

## २. शेतकरी व जमीनदार यांचा असंतोष व बेकारी :-



- बंगाल, पंजाबमधील कायमधारा पध्दतीने महसूल व्यवस्थेला स्थिरपणा आला खरा, पण सरकारचा ठराविक सारा न देता आल्याने अनेक जमीनदारांच्या जमिनी सरकारने ताब्यात घेतल्या. अशा जमिनदारांची प्रतिष्ठा धुळीला मिळाली.
- मद्रास, मुंबईसारख्या प्रांतांतून रयतवारी पध्दती सुरु करण्यात आली. पण तेथे जमीन महसुलाचा दर काही वेळा उत्पन्नाच्या ५०% इतका अन्यायी असे. अशा प्रसंगी शेतकऱ्यांच्या हलाखीस पारावार राहत नसे.
- हिंदुस्थानच्या अनेक प्रदेशांवर त्यांची मालकी प्रस्थापित होताच, ते मनमानी व्यापार करु लागले. येथील बाजारातील हिंदी माल त्यांच्या यंत्रावर तयार होणाऱ्या मालाशी स्पर्धा करु शकला नाही. परिणामी हिंदुस्थानातील पंरपरागत हस्तव्यवसाय व कलाकुसरीचे धंदे बुडाले. त्यामधील कारागीर शेतीकडे वळाले. सर्वत्र मोठी बेकारी व असंतोष निर्माण झाला.
- औंधचे राज्य खालसा केल्यावर तेथे रयतवारी पध्दती सुरु केली पण आतापर्यंत जे जमीन महसूल गोळा करत होते, ते जमीनदार (तालुकेदार) दूर सारले गेल्यामुळे असंतोषी बनले, त्यांचे आश्रित बेकार बनले.
- १८३७ मध्ये ८ लाख लोक दुष्काळाने मृत्युमुखी पडले.
- एका बाजुला ब्रिटनची झालेली भरभराट तर दुसऱ्या बाजूला भारतीयांचे दारिद्र्य यामुळे भारतीय जनता इंग्रजांच्या अन्यायी धोरणाविरुद्ध बंड करू लागली.

- पंडीत ईश्वरी प्रसाद म्हणतात "भारत मातेच्या दूधावर इंग्रज लठ्ठ झाले परंतु भारतीयांवर उपासमारीची वेळ आली."
- वरील अनेक कारणांमुळे इंग्रज विरोधी १८५७ चा उठाव घडून आला.

## लष्करी कारणे :-

### १. हिंदी शिपायांना मिळणारी अन्यायी वागणूक :-



- १८५७ चा उठाव प्रथम लष्करातील हिंदी शिपायांनी केला, याचे कारण त्यांच्यामध्ये कंपनी सरकारविरुध्द असंतोष खदखदत होता. हिंदी शिपायांना अत्यंत अपमानास्पद व अन्यायी वागणूक दिली जात होती. या उलट गोऱ्या शिपायांची प्रतिष्ठा व मिजास राखली जाई.
- हिंदी शिपायांहून गोऱ्या शिपायांना पगार अधिक असे. उदाहरणार्थ, नुकताच लष्करात आलेल्या गोऱ्या शिपायाचा पगार अनुभवी हिंदी सुभेदाराच्या पगाराइतका असे.
- तसेच एखाद्या हिंदी शिपायाने धर्मांतर करुन ख्रिस्ती धर्म स्वीकारला की त्याला बढती ठरलेली असे. हा प्रकार हिंदी शिपायांना संतापजनक वाटत होता. याशिवाय लष्करातील वरच्या हुद्याची जागा हिंदी सैनिक कितीही पराक्रमी असला तरी त्याला दिली जात नसे. अधिकाराच्या जागा ही गोऱ्यांची मक्तेदारी होती.
- लष्करी मोहिमांत इंग्रज अधिकारी प्रथम हिंदी शिपायांची फौज आघाडीवर धाडत, लढाई होऊन पहिल्या हल्ल्यात अनेक हिंदी शिपाई मारले गेले की, मग गोरी फौज पुढे सरकत असे, त्यामुळे हिंदी शिपायांची जीवितहानी मोठी होई व शेवटी विजयश्रीची माळ गळ्यात पडे. हा सर्वच प्रकार हिंदी शिपायांना संतापजनक वाटत होता.

### २. हिंदी शिपायांवरील जाचक निर्बंध :-

- १८०६ साली मद्रास आर्मीतील हिंदू शिपायांवर गंध न लावण्याची व दाढी न राखण्याची सक्ती करण्यात आली होती.
- १८२४ साली ब्रम्ही युध्दात बंगाल आर्मीतील हिंदू शिपायांवर समुद्रपर्यटनाची सक्ती करण्यात आली होती. या दोन्ही प्रसंगी हे आपल्या धर्मावर संकट मानून हिंदी शिपायांनी बंडे केली होती. पण इंग्रजांनी तो मोडून टाकला होता.
- अफगाण युध्दात हिंदू शिपायांबरोबर अफगाणिस्थानात जाण्याची सक्ती केली गेली होती. परत आल्यावर या शिपायांकडे धर्मभ्रष्ट म्हणून त्यांचे जातिबांधव पाहू लागले होते. जातीत येण्यासाठी त्यांना अनेक धार्मिक विधी करावे लागले होते. अपुरा पगार व भत्ता याबद्दल इ.स. १७६४ ते १८४४ या कालात हिंदी लष्कराने १० - १२ वेळा बंडाळ्या केल्या होत्या.
- इ.स. १८४९ साली पंजाब इंग्रजी साम्राज्याला जोडला, तेव्हा हजारो पंजाबी, शीख व मुसलमान शिपायांना इंग्रजी लष्करात घेण्यात आले होते. तेव्हा त्यांच्या दाढीला व डोक्यावरच्या केसाला आपण धक्का लावणार नाही. असे इंग्रजांनी वचन दिले होते. पण त्यांनी ते वचन पाळले नाही. परिणामी अनेक शीख व मुसलमान शिपायांनी लष्करी नोकरीचा त्याग केला व बेकारी पत्करली.
- 'बेंगॉल आर्मीत' औंधच्या राज्यातील बहुसंख्य शिपाई होते. औंध राज्य खालसा केल्यावर त्यांच्या भावना दुखावल्या. अशा प्रकारे इंग्रजी लष्करातील हिंदी शिपायांच्या असंतोषाला अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या होत्या.

### ३. गोरी फौज संख्येने कमी व त्या पंजाबमध्येच :-

- इंग्रजी लष्करात हिंदी शिपायांची संख्या गोऱ्या शिपायाच्या संख्येहून किती तरी अधिक होती, या महत्वाच्या गोष्टीची नोंद घेतली पाहिजे. इंग्रजी लष्करात २ लाख ३३ हजार हिंदी फौज होती, तर गोरी फौज फक्त ४५ हजार होती.
- शिपायांना या गोष्टींची जाणीव होती म्हणून आपण जर बंड पुकारले तर संख्येच्या जोरावर विजयी होऊ असा आत्मविश्वास त्यांना वाटत असावा. इंग्रजी राज्याच्या सुरक्षिततेसाठी गोऱ्यांची फौज वाढविली पाहिजे, असा इशारा डलहौसीने विलायत सरकारला दिला होता. पण सरकारने या धोक्याच्या कंदिलाकडे दुर्लक्ष केले होते.
- पंजाब नुकताच जिंकला होता. तेथे काही बंडाळी होऊ नये म्हणून ४५ हजार गोऱ्या फौजेपैकी ४० हजार फौज तेथेच ठेवण्यात आली होती. बिहार व बंगाल या प्रदेशातील दिनापूर व कलकत्ता ही दोन ठिकाणे सोडून अन्यत्र फारशी गोरी फौज ठेवण्यात आली नव्हती. बंडवाल्याच्या दृष्टीने ही महत्वाची व फायद्याची बाब होती.

## तात्कालिन कारण :-

- २९ मार्च १८५७ - बराकपूर - ३४ व्या फलटणीत - मंगलपांडे व लेप्टन बॉग यांच्यात संघर्ष होऊन मंगल पांडेने परेड करण्यास नकार दिला. त्यामुळे त्याला फलटणच्या बाहेर काढले असता. त्याने संबंधीत अधिकाऱ्यावर गोळीबार केला. ६ एप्रिल १८५७ ला मंगल पांडेस फाशी देण्यात आली.


मंगलपांडे

- कोणत्याही खदखदत्या असंतोषाचा उद्रेक होण्यासाठी निमित्त हवे असते. असे निमित्त म्हणजे त्या उद्रेकाचे तात्कालिक कारण असते ते प्रमुख कारण नसते. हिंदी शिपायांना (एनफिल्ड बंदूकांना) जी काडतुसे दिली जात, त्यांना गाईची व डुक्कराची चरबी लावलेली असते. ही बातमी १८५८ च्या उठावास तात्कालिक कारण ठरली. एनफिल्ड बंदूका वापरण्याचे प्रशिक्षण अंबाला, सियालकोट या ठिकाणी दिले जाई.
- काडतुसांच्या वापरासाठी ती प्रथम तोंडाने तोडावी लागत असत. साहजिकच त्यावरील चरबी शिपायांच्या तोंडात जात असे. गाईला हिंदू पवित्र मानतात, तर डुक्कराला मुसलमान अपवित्र मानतात.
- दोन्ही जनावरांच्या चरब्या दोन्ही धर्मियांना वेगवेगेळ्या अर्थाने निशिध्द होत्या. ही बातमी प्रथम कलकत्त्याच्या फौजेत पसरली व नंतर एखाद्या आगीप्रमाणे तिचा उत्तर हिंदुस्थानात सर्वत्र प्रसार झाला. हिंदू व मुसलमान शिपाई संतप्त झाले. आपला धर्म बुडविण्याचा इंग्रजांचा हा डाव आहे असे त्यांना वाटू लागले.
- त्यांनी याचा जाब आपल्या गोऱ्या अधिकाऱ्यांना विचारला, तेव्हा 'ही गोष्ट साफ खोटी' असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. पण शिपायांचा त्यावर विश्वास बसला नाही. त्याचा क्रोध वाढत गेला. या असंतोषाचा पहिला उद्रेक १० मे १८५८ रोजी मीरत येथील छावणीत झाला. शिपायांच्या बंडाची पहिली ठिणगी तेथे पडली.

## धार्मिक कारणे :-

- ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे आर्थिक साम्राज्यवादाबरोबरच धार्मिक साम्राज्य वादाचाही पुरस्कार केला.
- १८१३ च्या कायद्यानुसार धर्म प्रसारासाठी कंपनीची मदत मिळू लागली.
- ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्यांना वडीलोपार्जित संपत्तीत हिस्सा मिळत असे.
- अनाथ बालकांना अनेक प्रकारच्या सेवा सुविधा देवून ख्रिश्चन धर्माची दिक्षा दिली जाई.
- हिंदू व मुस्लिम यांच्या मंदिर व मशिदींची वतने काढली.
- धर्मगुरु व मौलवींची अप्रतिष्ठा झाली.
- भारतीयांना सक्तीने धर्मांतरण करण्यास भाग पाडले.
- धर्मांतरीत व्यक्तीला सरकारी नोकरीत समाविष्ट करण्याची खोटी अमिषे दिली.
- धर्मासंबंधी वरील बाबींमुळे असंतुष्टतेची भावना निर्माण झाली.
- १८५७ चा उठाव हा पूर्व पंजाब, दिल्ली, रोहीला खंड, बुंदेल खंड, अलाहाबाद, अवध व पश्चिम बिहार म्हणजेच उत्तर भारतात जास्त झाला.



## १८५७ च्या उठावाचा प्रसार आणि शेवट :-

## मीरत / मेरठ :-



- ३ मे १८५७ रोजी लखनौ व ५ मे १८५७ रोजी अयोध्या येथील लष्करी तुकड्यांनी काडतुसे वापरण्यास सुरुवातीला नकार दिला होता.
- १८५७ च्या मे महिन्याची ९ तारीख होती. त्या दिवशी इंग्रज अधिकाऱ्यांनी दिलेली काडतुसे घेण्यास मीरत येथील छावणीतील ८५ शिपायांनी (III Calvary) नकार दिला. लष्करी हुकुमाचा भंग केल्याबद्दल त्या शिपायांना प्रत्येकी १० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली. त्याकाळी सक्तमजुरीची शिक्षा झालेल्या कैद्यांच्या पायात बेडया ठोकत असत.
- दुसऱ्या दिवशी या कैद्यांच्या पायात बेडया ठोकण्याचे काम इतर सर्व शिपायांच्या समोर सुरु करण्यात आले. ते ८५ कैदी गोऱ्या अधिकाऱ्याकंडे दयेची याचना करु लागले. तथापि त्यांना दया दाखविण्यात आली नाही. तेव्हा या कैद्यांनी समोर उभ्या असलेल्या आपल्या शिपाईबंधूना, 'तुमचे सोबती शिक्षेला बळी पडत असता तुम्ही नामर्दासारखे उभे का?' असा सवाल केला.
- दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवार दि. १० मे रोजी सायंकाळी या शिपाईबंधूनी बंडाचा झेंडा उभारला, इंग्रज अधिकाऱ्यांना गोळ्या घालून ठार केले आणि तुरुंगाकडे धाव घेऊन, तो फोडून, शिपाई कैद्यांना मुक्त केले. 'कंपनी सरकारचे राज्य खलास झाले.' अशा त्यांनी आरोळ्या दिल्या.

- छावणीवर आता बंडवाल्याचे वर्चस्व निर्माण झाले. ही बातमी मीरत गावात पसरताच गुंडांनी लुटालुट सुरु केली. आपण बंड केले खरे, पण पुढे काय करायचे यावर बंडवाले विचार करु लागले. शेवटी दिल्लीकडे कूच करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. एकेकाळची हिंदुस्थानची ही वैभवशाली राजधानी अजूनही त्यांना आकर्षित करत होती. नामधारी का असेना पण तेथे मोगल बादशहा बहादूरशहा अद्यापि जिवंत होता.

## दिल्ली :-



बहादूरशहा

- मीरतपासून दिल्ली ७१ कि.मी. आहे. ते अंतर कापून बंडवाले शिपाई दुसऱ्या दिवशी दिल्लीस आले. बहादूरशहा यास सिंहासनावर बसवून त्याची राजवट सुरु झाल्याची घोषणा त्यांना करावयाची होती. बादशहा हा नावाचाच बादशहा बनला होता.
- एकेकाळचे त्यांच्या पूर्वजाचे वैभवशाली साम्राज्य व बलाढय सत्ता या गोष्टी आता इतिहासजमा झाल्या होत्या. इंग्रजांच्या पूर्ण वर्चस्वाखाली जाऊन ते त्यांचे बाहुले बनले होते. अशा परिस्थितीत बंडवाल्यांना साथ देणे, त्याला धोक्याचे वाटत होते.
- बंडवाल्यांनी दिल्लीतील गोऱ्याच्या कत्तली सुरु करुन मोठी नासधूस माजविली होती. बंडवाल्याचे पारडे जड होते. शेवटी त्यांच्या दबावाखाली त्याने सिंहासनावर बसण्याचे व हिंदुस्थानचा बादशहा होण्याचे कबूल केले. त्याचप्रमाणे समांरभही घडून आला. यानंतर दिल्लीतील दारुगोळ्याच्या कोठाराचा ताबा घेण्यासाठी बंडवाल्यांनी तिकडे धाव घेतली, पण कोठारावर असणाऱ्या इंग्रज दिल्ली शस्त्रागार अधिकारी स्कली याने कोठारास आग लावून प्रचंड स्फोट घडवून आणला व त्यामुळे उठाववाल्यांच्या हाती शस्त्रास्त्रे पडली नाही.
- त्यात शेकडो लोक नष्ट झाले. हे सर्व घडत असता प्रसंगावधान प्रमुख शहरातील इंग्रज अधिकाऱ्यांना कळवून टाकली होती. इंग्रजांकडे असलेल्या या शास्त्रीय साधनाचा त्यांना अनमोल फायदा झाला. जी बंडाची बातमी कळण्यासाठी पूर्वीच्या काळी कित्येक आठवडे लागले असते, तेथे ती काही क्षणात जाऊन पोहोचली. बंडवाल्यांकडे असे काही साधन नव्हते, हे लक्षात ठेवले पाहिजे.
- २४ तासांत दिल्ली बंडवाल्यांच्या हाती आली. कालपर्यंत 'गुलाम' असलेला बहादूरशाहा त्यांनी 'हिंदुस्थानचा सम्राट' बनवला. परंतु 'बंड' करणे सोपे असते, ते 'यशस्वी' करणे अवघड असते. वास्तविक उत्तर हिंदुस्थानातील या वेळची इंग्रजांची अवस्था मोठी नाजूक होती.
- कडक उष्मा असल्यामुळे बडे इंग्रज अधिकारी विश्रांतीसाठी थंड हवेच्या ठिकाणी गेले होते. एकूण ४५ हजार गोऱ्या फौजेपैकी ४० हजार फौज पंजाबमध्ये होती. राहिलेली फौज विखुरलेल्या अवस्थेत होती. खुद्द दिल्लीत इंग्रजांनी गोरी फौज ठेवलेली नव्हती. परंतु लवकरच इंग्रजांनी पंजाब वगैरे प्रदेशातून दिल्लीकडे फौजा गोळा केल्या. 'गुरखा, शीख' इत्यादी लढाऊ जातींची नव्याने लष्कर भरती करण्यात आली. जूनमध्ये इंग्रजांची एकूण ६५ हजार फौज दिल्लीभोवती उभी राहिली.
- दिल्ली म्हणजे हिंदुस्थानची पूर्वापारची राजधानी ती आपण काबीज केली की, बंडवाल्यांच्या उठावाचा कणाच मोडेल, असा इंग्रजांचा यथार्थ अंदाज होता. बंडवाल्यांचीही फौज फुगत चालली होती. बंडवाल्यांपैकी काहींनी खुद्द दिल्लीत लुटालुट करण्यास प्रारंभ केला होता. त्यामुळे बंडवाल्यांना स्थानिक प्रजेची सहानुभूती मिळाली नाही.



- खुद्द बंडवाल्यांच्या नेत्यांना दिल्ली व आसपासचा जिंकलेला प्रदेश येथे व्यवस्था निर्माण करता आली नाही. प्रसिध्द इतिहासकार थॉम्सन व गॅरेट म्हणतात, 'बंडाचा प्रारंभ तर यशस्वी झाला, पण उत्तर हिंदुस्थानातील इंग्रजांच्या नाजूक अवस्थेचा फायदा उठविणारा एकही कार्यक्षम नेता बंडवाल्याजवळ नाही. हे लवकरच स्पष्ट झाले.' १५ सप्टेंबर १८५७ रोजी इंग्रज व बंडवाले यांच्यातील लढाईस तोंड फुटले.
- बंडवाल्यांनी इंग्रजी फौजाशी सतत १० दिवस झुंज दिली. त्यानंतर २५ सप्टेंबर १८५७ रोजी इंग्रजांनी ३ लाख १० हजार फौज खडी करून दिल्लीचा ताबा घेतला. या लढाईत इंग्रज फौजातील पंजाबी, शीख व गुरखा या शिपायांनी मोठी कामगिरी बजावली. पुढे इंग्रजांनी या बहादूर शहाला दिल्लीत न ठेवता ब्रम्हदेशात पाठवून तेथे ठेवले.

## कानपूर :-

- मिरत व दिल्ली येथील उठावाच्या यशस्वी वाटचालीमुळे सर्वच लष्करी छावण्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. कानपूर शहराचा विकास इंग्रज कंपनीच्या कारकीर्दीतच झाला होता. कानपूर येथे इंग्रज फौजेच्या छावण्या असत. जवळच ब्रम्हावर्त येथे मराठयांचा पदच्युत पेशवा, दुसरा बाजीराव, याचे निवासस्थान होते.
- मृत्यूपूर्वी त्याने धोंडोपंत उर्फ नानासाहेब याला दत्तक घेतले होते. पण बाजीरावांनंतर त्यास मिळणारा आठ लाखाचा तनखा, छोटी जहागीर व पदव्या नानासाहेबास बहाल करण्यास इंग्रज राज्यकर्त्यांनी नकार दिला होता. त्यामुळे नानासाहेबांच्या हृदयात सूडाचा अग्नी धुमसत होताच, पण इंग्रजांच्या सामर्थ्यापुढे तात्पुरते त्याने नमते घेतले होते. आता सूड उगवण्याची आयती संधी त्यास चालून आली होती.



नानासाहेब

- मीरत येथील शिपायांचे बंड, त्यांची दिल्लीवरील चाल, दिल्लीतील प्रारंभीचा विजय या बातम्या कानपुरातील इंग्रज फौजेतील हिंदी शिपायांच्या कानावर लगेच आल्या. कानपूरचे शिपाई व त्यांचे गोरे अधिकारी दोघेही या बातम्यांनी अस्वस्थ झाले. परिस्थिती दिवसेंदिवस स्फोटक बनली आणि शेवटी ५ जून १८५७ रोजी एका गोऱ्याने हिंदी शिपायांवर गोळीबार केला आणि शिपायांच्या असंतोषाचा स्फोट झाला. तात्या टोपे व हजीमुल्ला खान (सेनापती) यांनी नानासाहेबांचे संस्थान वाचविण्यासाठी सर ह्यु. विल्हर याला शरण येण्यास भाग पाडले.
- त्यांनी लगेच बंड पुकारले आणि दिल्लीकडे प्रयाण केले. वाटेत त्यांनी नानासाहेबांची भेट घेतली. बंडवाल्यांना नेता हवा होता. तो त्यांना नानासाहेबांच्या रुपात मिळाला. नानासाहेबांने त्यांचे पुढारीपण स्वीकारले. तथापि त्याने दिल्लीकडे कूच न करता आपली फौज कानपुरास परत आणली. दरम्यानच्या काळात कानपूरातील इंग्रज लोक एका खंदकाच्या इमारतीत आश्रयाला गेले होते. बंडवाल्यांनी त्यांना वेढा दिला.
- आतील इंग्रजांनी मोठया चिकाटीने व शौर्याने सतत २१ दिवस बंडवाल्यांचा प्रतिकार केला. शेवटी २६ जूनला बंडवाले व इंग्रज यांच्यात करार झाला व बंडवाल्यांनी त्यांना जीवदान दिले. इमारतीतील इंग्रज बाहेर येऊन नावांनी अलाहाबादेस जाण्यासाठी नदीच्या काटावर पोहोचले. सर्वजण बायका मुलांसह नावांत चढले व आता नाव सुटणार तोच त्यांच्यावर बंडवाल्यांनी अचानक गोळीबार सुरु केला.
- नानासाहेबांच्या कानावर ही वार्ता जाताच त्यांनी इंग्रज स्त्री-पुरुषांची ही कत्तल थांबवली. त्यामुळे १००-१२५ लोक वाचले. बंडवाल्यांनी केलेला हा विश्वासघात होता. त्याचे प्रायश्चित पुढे उत्तर हिंदुस्थानातील निरपराध प्रजेला इंग्रजांकडून भोगावे लागले.
- १ जुलै रोजी नानासाहेब 'पेशवा' बनल्याचा व कंपनी राज्य नष्ट झाल्याचा जाहीरनामा काढण्यात आला. परंतु कानपूर हातातून गेल्याचे कळताच इंग्रजांनी तिकडे फौजा पाठविल्या होत्या आणि या फौजांचा पराभव केल्याशिवाय नानासाहेबांची कानपुरातील नवी राजवट सुरक्षित राहणार नव्हती. इंग्रज फौजा कानपुरावर येण्यापूर्वीच नानासाहेबाने फौजेनिशी कूच करुन त्यांच्याशी लढाई केली. (१२ जुलै) इंग्रजांच्या तोफखान्याने नानासाहेबांच्या फौजेचा धुव्वा उडाला व ती पराभूत झाली.
- लवकरच इंग्रजांनी कानपुरावर चाल करुन ते सर केले (१७ जुलै). पराभूत झालेला नानासाहेब पेशवा औंधच्या प्रदेशात निसटला व इंग्रजांच्या प्रतिकाराची तयारी करु लागला. दरम्यान कानपूर इंग्रजांच्या हाती पडण्यापूर्वी बंडबाल्यांनी घाटावरील हत्याकांडातून बचावलेल्या शे-सव्वाशे इंग्रज लोकांची कत्तल करावयाचे ठरविले.



तात्या टोप

- शिपायांनी असले नीच कृत्य करावयास नकार दिल्यावर कानपूरातील पाच खाटकांच्याकडे ही कामगिरी सोपविण्यात आली. त्यांनी बकरी-मेंढया तोडाव्यात त्याप्रमाणे इंग्रज कैद्यांना तोडून टाकले. ही कत्तल नानासाहेबांने करविली असा आरोप त्यावेळी सर्वत्र केला जात होता.
- १७ जुलै १८५७ रोजी ब्रिटिश अधिकारी नानासाहेब व तात्या टोपे यांचा पराभव करून जनरल कॅम्प बेलने कानपूरचा ताबा घेतला.
- नानासाहेब नेपाळमध्ये आश्रयासाठी निघून गेले तर मागे सेनापती तात्या टोपे जवळजवळ दहा महिने इंग्रजांशी लढत होते. परंतु फितुरीमुळे त्यांनाही इंग्रजांनी अटक करून १८ एप्रिल १८५९ रोजी मध्य प्रदेश क्षिप्री येथे फासावर लटकविले.

## लखनौ :-



हजरत महाल

- 'लखनौ' ही औंधची (अयोध्या) राजधानी होती. औंधच्या प्रदेशातच बंडाचा मोठा उद्‌भव प्रसार झाला. याचे कारण औंधच्या नबाबाचे राज्य तर कंपनी सरकारने खालसा केले होतेच, शिवाय नव्या सरकारी धोरणामुळे हजारो जमीनदार (तालुकेदार) बेकार व प्रतिष्ठाहीन बनले होते. नबाबाचे राज्य खालसा झाल्याने हजारो शिपाई बेकार झाले होते. तेव्हा स्फोटासाठी असा दारुगोळा तयार होता. फक्त ठिणगीची गरज होती.
- मीरत, दिल्ली इत्यादी ठिकाणच्या बंडाच्या बातम्यांनी ही ठिणगी औंधच्या पूर्वीच्या राज्यातील अधिकारी व सरंजामदार, तालुकेदार, बेकार नोकरचाकर व सैनिक, औंधच्या राजघराण्याबद्दल आदर असणारी सामान्य जनता, हे सर्व बंडात सामील झाले. उठाव एवढा जोराचा होता की औंधमधील इंग्रजी राज्ये अवघ्या १०-१२ दिवसांत समाप्त झाले.
- लखनौमधील इंग्रज लोक व गोरे सैन्य यांनी प्रसंगावधान राखून इंग्रज रेसिडेन्सीत आश्रय घेतला. इंग्रज रेसिडेन्टने त्यांच्या रक्षणाची चांगली व्यवस्था केली. रेसिडेन्सीमध्ये दोन हजार इंग्रज होते व त्यांच्या भोवती १ लाख बंडवाल्यांनी गराडा दिला होता.

- त्यात बिनलढाऊ बरेचजण होते. वेढयात सापडलेल्या इंग्रजांनी मनोधैर्य खचू न देता सतत ६ महिने बंडवाल्यांशी प्रतिकार केला. दोन हजारांनी लाख लोकांशी दिलेली ही झुंज खास कौतुकास्पद मानली पाहिजे. औंधमधील बंडवाल्यांनी इंग्रज स्त्री-पुरुषांवर अत्याचार केले नाहीत ही गोष्टही या ठिकाणी नोंदली पाहिजे.
- औंधच्या नबाबाच्या ‘हजरत महाल’ या बेगमने बंडवाल्यांचे नेतृत्व स्वीकारलेले होते. बंड पुकारले गेल्यावर तिचा अल्पवयीन पुत्र औंधच्या गादीवर बसल्याचे व इंग्रजी राज्य समाप्त झाल्याचे घोषित केले गेले होते.

## बिहार :-


कुवरसिंह

- बिहारमधील ‘दानापूर’ येथे (पटणाजवळ) इंग्रजांची हिंदी फौज होती. ही फौज बंड करेल, या भीतीने तेथील ‘लॉईड’ या इंग्रज अधिकाऱ्याने हिंदी शिपायांना नि:शस्त्र करण्याचा निर्णय घेतला. त्याच्या हुकुमाप्रमाणे हिंदी शिपाई आपली शस्त्रे खाली ठेवत असतानाच गोऱ्यांची फौज तेथे येऊन पोहोचली.
- हिंदी शिपायांचा असा समज झाला की आपणास नि:शस्त्र करुन आपली कत्तल करण्याचा लॉईडचा डाव आहे. त्यांनी लगेच शस्त्रे हाती घेऊन गोऱ्या फौजेवर गोळीबार सुरु केला आणि अशाप्रकारे दानपूरमध्ये बंडाची सुरुवात झाली.
- बिहारमधील जगदीशपूरचा वृध्द जमीनदार कुवरसिंह यावर इंग्रजांनी बरीच जुलूम जबरदस्ती केली होती. त्याने बंडवाल्या शिपायांचे नेतृत्व स्वीकारले. त्याच्याशी इंग्रजांच्या अनेक लढाया घडून आल्या.
- कुवरसिंहने असामान्य शौर्य गाजविले. तथापि इंग्रज फौजेपुढे त्याचा निभाव लागला नाही. म्हणून तो २७ एप्रिल १८५८ रोजी मरण पावला. त्याच्या नंतर त्याच्या अमरसिंग नावाच्या बंधूने इंग्रजांशी संघर्ष चालू ठेवला, पण त्यालाही यश मिळाले नाही.

## झाशी :-


झाशीची राणी

- ‘दत्तक वारस नामंजूर’ या तत्त्वानुसार ‘झाशीची राणी लक्ष्मीबाई’च्या दत्तक पुत्रास डलहौसीने राज्याधिकार नाकारला होता व झाशीचे राज्य खालसा केले होते. राणीला आपल्या पारतंत्र्याची जाणीव सारखी सतावत होती. खुद्द तिच्या खजिन्यावर तिचा ताबा नव्हता.
- आपल्या मुलाच्या मुंजीसाठी तिने आपल्याच खजिन्यातील १ लाख रुपये आपणास देण्याची इंग्रजांकडे विनंती केली. तेव्हा इंग्रजांनी तिच्याकडे जामीन मागितला. राणी अशी अपमानित व असहाय्य होत होती. तिच्या ठिकाणी क्षात्रतेज होते. १८५७ च्या उठावाने या क्षात्रतेजाला संधी मिळाली.
- सर ह्यु रोज याने ४ एप्रिल १८५८ ला राणीचा पराभव केल्यानंतर ती ‘काल्पीला’ पोहचली. बंडाच्या वार्ता जेव्हा झाशीवर थडकल्या तेव्हा तेथील हिंदी शिपायांनीही बंड पुकारुन हिंदी अधिकाऱ्यांची कत्तल केली (६जून). त्यातून वाचलेल्या इंग्रजांनी झाशीच्या किल्ल्यात आश्रय घेतला. बंडवाल्यांनी त्यांच्याशी वाटाघाटी करुन त्यांना जीवदानाचे आश्वासन दिले.
- पण इंग्रज जेव्हा बाहेर आले तेव्हा त्यांना विश्वासघाताने ठार केले. (८ जून) इंग्रजांची ही कत्तल राणीने घडवून आणली नव्हती. तथापि यानंतर बंडवाल्यांनी राणीकडे जाऊन बरेच द्रव्य घेतले व त्यांनी पुढे दिल्लीकडे कूच केले.
- यावेळी नानासाहेब पेशव्याप्रमाणे तिने बंडवाल्यांचे नेतृत्व स्वीकारले नाही. एवढेच नव्हे तर राणी आपल्याशी एकनिष्ठ राहिल्याचे पाहून इंग्रजांनी झाशीचा राज्यकारभार आपल्यावतीने तिच्याकडे सुपूर्त केला (जानेवरी १८५८). तथापि इंग्रजांचा हा डावपेच होता.
- बंडाच्या संकटातून सावरत असतानाच ते झाशीस झालेल्या इंग्रजांच्या कत्तलीचा राणीविरुध्दचा पुरावा चालला नाही, याबद्दल राणीने इंग्रजांना वारंवार पत्र लिहून आपली बाजू स्वच्छ असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. पण आता इंग्रजांना राणीभोवती फास आवळावयाचा होता. परिणामी राणीचे इंग्रजांशी असलेले संबंध झपाटयाने बिघडू लागले.
- झाशीच्या कत्तलीचा आरोप आपणावर ठेवून इंग्रज आपणास फाशी देणार, याबद्दल तिची खात्री झाली. तेव्हा असे नामुष्कीचे मरण पत्करण्यापेक्षा इंग्रजांशी लढून मरण पत्करण्याचे तिने ठरविले. झाशी लढविण्याची राणीने पूर्ण लष्करी तयारी केली.
- ‘सर ह्यू रोज’ या सेनानीच्या आधिपत्याखाली इंग्रज फौजा झाशीवर चाल करुन आल्या आणि त्यांनी झाशीच्या किल्ल्यास वेढा दिला. राणी मोठया पराक्रमाने किल्ला लढवू लागली. एवढयात नानासाहेबांचा सेनापती तात्या टोपे झाशींच्या बचावास धावला. परंतु तात्याशी लढून इंग्रजांनी त्यास पराभूत केले आणि मोठया जोमाने हल्ला करुन त्यांनी झाशीच्या तटबंदीस खिंडार पाडले.
- इंग्रज फौज आत शिरुन लुटालूट व कत्तल करु लागली. इंग्रजांना वाटले की, राणी आता हाती पडणार पण झाशी इंग्रजांच्या हाती पडत असता घोडयावर स्वार होऊन ती मोठया युक्तीने किल्ल्याबाहेर पडली होती.
- अविश्रांत घोडदौड करुन राणी प्रथम ‘काल्पीला’ पोहोचली. काल्पीत ‘नानासाहेब, तात्या टोपे, बांध्याचा नबाब व इतर बंडवाल्यांचे नेते’ एकत्र जमले होते. लवकरच सर ह्यू रोजच्या फौजेशी त्यांच्या दोन मोठया लढय्या झाल्या. एका लढाईत खुद्द राणीने लष्कराचे नेतृत्व केले होते.



सर ह्यू रोज

- दोन्हीही लढाईत बंडवाल्यांचा पराभव झाल्यावर ह्यू रोजने 'काल्पी' जिंकली आणि राणी व तात्या टोपे ग्वाल्हेरकडे आले. ग्वाल्हेरच्या शिंदेच्या फौजेत तत्पूर्वीच बंडाचा प्रसार झाला होता. राणी व तात्या जाताच शिपायांनी त्यांचे नेतृत्व स्वीकारले. ग्वाल्हेरचा राजा जयाजीराव पळून आग्रायांस गेला. ग्वाल्हेरचा किल्ला राणीच्या हाती आला.
- ह्यू रोजला हे वृत्त समजताच तो काल्पीहून सहसैन्य ग्वाल्हेरला चाल करुन आला. मार्गात या इंग्रजी फौजेस बंडवाल्यांनी प्रतिकार केला, पण तो मोडून ती फौज ग्वाल्हेरजवळ येऊन पोहोचली, आता धुमश्चक्रीच्या लढाईस सुरुवात झाली.
- इंग्रजी फौजेचे अधिपत्य ज. स्मिथ व रोज करत होते. बंडवाल्यांचे नेतृत्व राणी लक्ष्मीबाई करत होती. लढाऊ पोशाख परिधान करुन ती जणू रणचंडिकाच बनली होती. तिने वैयक्तिक पराक्रम खूप गाजविला. पण इंग्रजांची फौज संख्येने भारी होती. शेवटी सर्व बाजूशी शत्रूसैन्याने तिला वेढले तेव्हा या वेढयातून घोडा उडवून ती बाहेर पडली. शत्रुने तिचा पाठलाग सुरु केला. शेवटी एक नाल्याजवळ तिचा घोडा अडला.
- एवढयात मागून येणाऱ्या शत्रू-सैनिकांनी तिच्या डोक्यावर व छातीवर जबर वार केले. त्या वारांनी मृत्यूला कवटाळण्यापूर्वी तिने वार करणाऱ्या दोन शत्रु-सैनिकांना ठार केले. इंग्रजांची सरशी झाली. १७ जून १८५८ रोजी ग्वाल्हेर येथे झाँशीच्या राणीचा मृत्यू झाला. दुसऱ्या दिवशी ग्वाल्हेर त्यांच्या ताब्यात आले.



झाशीची राणी

- राणीच्या मृत्यू नंतर तिच्याशी लढणाऱ्या सर ह्यू रोजने धन्योद्गार काढले. 'Although a lady, she was the bravest and best military leader of the rebels, a man among the mutincers'
- प्रा. न. र. फाटक तिची महती गाताना म्हणतात, 'एखादा प्रचंड तेजोगोल स्थानभ्रष्ट होऊन अंतरिक्षातून ज्यावेळी चकाकत जातो, त्याच्या गतीमागे पुष्कळ वेळपर्यंत एक तेजोरेषा चमकत राहते. त्याप्रमाणे लक्ष्मीबाईचे खरे तेजस्वी चरित्र इतिहासदृष्टया अल्पकालीन असले तरी त्याची महती चिरकालीन आहे. स्वातंत्र्यावीर सावरकर आपल्या प्रतिभासंपन्न लेखणीने अशी श्रध्दांजली वाहतात.
- 'सत्तावनच्या स्वातंत्र्य समरातील अग्निकल्लोळाची ही शेवटची ज्वाला असेल. एक पंचविशीच्या आत, रुपाने खुबसुरत, वर्तनाने मनमोहक, आचरणाने सच्छील, राज्याचे नियमसामर्थ्य, प्रजेची प्रीती, स्वदेशभक्तीची जाज्वल्य ज्वाला, स्वातंत्र्यांची स्वतंत्रता, मानाची माननीयता, रणाची रणलक्ष्मी', लक्ष्मीराणी आमची आहे.' इंग्लंडच्या इतिहासात तो मान अजून कोणालाही मिळालेला नाही.

## बरेली : -



- रोहील खंडात मौलवी अहमद उल्ला यांनी १८५७ मध्ये गावो गावी फिरुन ब्रिटिशांच्या विरोधात बंड निर्माण केले.
- फैजाबाद या ठिकाणी त्यानी हिंड्री लॉरेन्सला पराभूत केले, मात्र जगन्नाथ सिंग नावाच्या व्यक्तीने त्याला पकडून दिले व इंग्रजांनी मौलवी अहमद उल्ला याला ठार मारले. बेगम हजरत महल यांनी इंग्रजांच्या विरुद्ध बंड घडून आणले.

### ❖ इतर ठिकाणचे उठाव आणि त्यांचे नेतृत्व :-

| बिमोड तारीख | ठिकाण | नेतृत्व | बिमोड करणारे इंग्रज अधिकारी |
|---|---|---|---|
| २४ सप्टेंबर १८५७ | दिल्ली | बहादूरशहा जफर<br>सेनापती - बख्तखान | निकोलसन |
| १७ जुलै १८५७ | कानपूर | नानासाहेब पेशवे<br>सेनापती – तात्या टोपे | कॅम्पबेल |
| १८ जून १८५८ | झाशी | राणी लक्ष्मीबाई | ह्यु रोज |
| २२ मार्च १८५८ | अवध | बेगम हजरत महल | हॅवलॉक कॅम्पबेल |
| एप्रिल १८५८ | जगदिशपूर | कुवरसिंग / अमरसिंग | टेलर |
| | फैजाबाद | मौलवी अहमदुल्ला | |
| मे १८५७ | बरेली | बेगम हजरत महल<br>खान बहादूरखान | |
| | आसाम | मणीरामदत्त | |





# १८५७ चा उठाव अयशस्वी का झाला ?

## १. बंडाचा फैलाव सर्व हिंदुस्थानभर झाला नाही:-

- हा उठाव सर्व हिंदुस्थानभर एकाच वेळी होऊ शकला नाही, हे त्याच्या अपयशाचे पहिले कारण आहे. दक्षिण हिंदुस्थानातील महाराष्ट्र, म्हैसूर, मद्रास, केरळ इत्यादी प्रदेशात शांतता राहिली. त्यामुळे उत्तरेतील बंड पुकारलेल्या प्रदेशात इंग्रजांनी आपली लष्करी शक्ती एकवटली.
- उत्तरेकडेही राजपुताना, पंजाब, नेपाळ व बंगालचा बराचसा भाग येथे बंडाचा उद्‌भव झाला नाही. अफगाणिस्थाननेही या वेळी मित्रत्वाचे संबंध ठेवले. पंजाबमधील शांतता मात्र आश्चर्यजनक होती. पंजाबचे शीखांचे राज्य इंग्रजांनी नुकतेच खालसा केले होते.
- तरीही तेथील स्वाभिमानी व शूर लोक शांतच राहिले. एवढेच नव्हे तर पंजाबी शीखांच्या फौजाही इंग्रजांशी एकनिष्ठ राहिल्या.
- पंजाब बंड करु उठला असता आणि शीख फौजा एकनिष्ठ राहिल्या नसत्या तर दिल्लीचा वेढा यशस्वी होणे केवळ अशक्य होते, असे सर डब्ल्यू रसेल या इंग्रजाने कबूल केले आहे. इंग्रजांनी दिल्ली बंडवाल्यांपासून जिंकली, ती शीख लष्कराच्या साहाय्याने, हे लक्षात घेतले पाहिजे.
- म्हणजेच दक्षिण हिंदुस्थानात या उठावाचे लोण जवळजवळ पसरलेच नाही.

## २. बंडवाल्यांना सर्वमान्य नेता मिळू शकला नाही.:-

- या उठावात, हिंदी लोकांना, विशेषत: बंडवाल्यांना, सर्वमान्य नेता मिळू शकला नाही. राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, कुंवरसिंह यांनी शिपायांचे नेतृत्व स्वीकारुन आपल्या अंगचे शौर्य अनेक लढायांत दाखविले, हे खरे, तथापि त्यांच्यापैकी कोणी एकजण सर्वमान्य नेता बनू शकला नाही.
- बहादूरशहा नानासाहेब, राणी लक्ष्मीबाई, बेगम हजरत महाल यांनी आपापल्या बंडवाल्यांचे नेतृत्व केले व परस्परास सहकार्यही केले. परंतु परस्परांशी सहकार्य वेगळे व सर्वमान्य नेतृत्व वेगळे असे नेतृत्व निर्माण होण्यासारखी त्यावेळची हिंदुस्थानची परिस्थितीही नव्हती आणि बंडवाल्यांना तेवढा अवधीही मिळालेला नव्हता.
- बहादुरशहा जफर दुसरा हा वृद्ध निराशावादी व दुर्बळ व्यक्ती होता. त्याची पत्नी जिन्नत व त्याच्या मुलांनी इंग्रजांना मदत केली.
- हिंदुस्थानातील असंतोषाचा फायदा उठवून पुढे म. गांधीजींनी जसे सर्वमान्य राष्ट्रीय नेतृत्व निर्माण केले तसे नेतृत्व यावेळी निर्माण झालेले नव्हते. याउलट इंग्रजांचा कारभार एका हाती होता. साध्या शिपायापासून ते गव्हर्नर जनरलपर्यंत कारभार-यंत्रणा बांधली गेली होती. हिंदुस्थानातील इंग्रजी सत्तेचे नेतृत्व गव्हर्नर जनरल करत होता. त्याच्या हुकुमांना हिंदुस्थानात कोणी आव्हान देऊ शकत नव्हते.

## ३. हिंदी राजेरजवाडयांच्या पाठिंब्यांचा अभाव:-

- वास्तविक इंग्रजांच्या आक्रमक व स्वार्थी धोरणाखाली हिंदुस्थानातील अनेक संस्थानिक भरडले गेले होते, कोणाचे राज्य गेले तर कोणाची पदवी गेली, तर कोणाचा तनखा गेला असला तरीही त्यांच्यापैकी राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवा, बादशहा बहादूरशहा, कुंवरसिंह, हजरत महाल असे काहीजण सोडल्यास बाकीचे संस्थानिक हात बांधून स्वस्थ राहिले.
- शिंदे-होळकर हे मराठयांचे एकेकाळचे मोठे सरदार. त्यांच्या लष्करांनी बंड पुकारले, पण हे सरदार मात्र इंग्रजी साम्राज्याशी एकनिष्ठ राहिले. ग्वाल्हेरच्या शिंदे यांचा दिवाण सर दिनकरराव व हैद्राबादच्या निजामाचा दिवाण सर सलारजंग, काश्मिरचा राजा गुलाब सिंग, भोपाळचा नवाब इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले.
- 'भारतामधील या दोन थोर राजकारणी पुरुषांनी ब्रिटिशांचे हिंदी साम्राज्य येथे राखण्यासाठी जी कामगिरी केली, तिचे मोल करणेच कठीण आहे,' असे इंग्रज इतिहासकार पी.ई.रॉबर्टस यांनी म्हटले आहे.

## ४. सर्वमान्य ध्येयाचा व कार्यक्रमाचा अभाव:-

- १८५७ च्या उठावातील बंडवाल्याच्या समोर कोणती ध्येये होती? बंडवाले व त्यांचे नेते यांना इंग्रजांचा पराभव करुन त्यांची राजवट नष्ट करावयाची होती, असे सर्वसाधारणपणे सांगता येईल. पण इंग्रजांचा पराभव कशासाठी करावयाचा होता अथवा तो झाल्यावर बंडवाल्यांना काय हवे होते? याचे उत्तर अगदी स्पष्ट आहे.
- मोगल बादशहाला सिंहासन प्राप्त करुन, जमल्यास आपल्या सत्तेचे थोडे बहुत पुनरुज्जीवन कराचे होते. नानासाहेबांस पेशवाई मिळवून मराठी राज्याचे पुनरुज्जीवन करावयाचे होते. राणी लक्ष्मीबाई, बेगम हजरत महाल यांना पूर्वीसारखी आपली राज्ये हवी होती आणि शिपायांना आपल्या गोऱ्या अधिकाऱ्यांच्या अन्यायी उद्दाम वृत्तीचा सूड उगवावयाचा होता. सारांश, ध्येयांमधील सुसूत्रता हिंदी नेत्यांत दिसून येत नाही.

- तसेच सर्व बंडवाल्यांचा मिळून एक सुसूत्र कार्यक्रम एक सुसूत्र योजना, असे काही या उठावात दिसत नाही. या संदर्भात मौलाना आझाद म्हणतात, '१८५७ चा उठाव हा सुसूत्र योजनेतून निर्माण झालेला नव्हता अथवा त्या मागे एखादा हुकुमी नेताही नव्हता, असा उपलब्ध कागदपत्रांच्या अभ्यासावरुन निष्कर्ष काढण्याशिवाय दुसरा पर्याय राहात नाही.'
- काही इतिहासकारांच्या मते बंडवाल्यांनी बंडाचा झेंडा सर्व देशभर उभारावयाची तारीख ३१ मे अशी ठरविली होती. परंतु बंडाचा स्फोट अगोदरच म्हणजे १० मे ला मीरत येथे घडून आला आणि बंडाचा कार्यक्रम सर्वत्र पोहोचण्यापूर्वीच बंड सुरु झाले.
- त्यामुळे बंडाचे पूर्व-नियोजने होऊ शकले नाही. यानंतर अनेक लष्करी छावण्यात शिपायांनी बंडे पुकारली, पण त्यांच्या बंडाच्या हालचालीत कोणतीच सुसूत्रता राहिली नाही. त्यांच्यामधील या गोंधळाचा इंग्रजांनी मात्र फायदा उठविला.

## ५. आंतरराष्ट्रीय परिस्थिती इंग्रजांना अनुकूल :-

- या उठावाच्या पूर्वी नुकतेच रशियाशी चालू असलेली क्रिमियन युध्द संपूर्ण इंग्लंड विजयी झाले होते. म्हणजे क्रिमियन युध्दातून इंग्रज फौजा मोकळ्या झाल्या होत्या (इ.स.१८५६) क्रिमियन युध्दातील विजयामुळे इंग्रजांची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा व सामर्थ्य वाढले होते.
- सर्व जगातील प्रमुख देशाशी त्यांचा व्यापार होता. त्यांचे आरमारी सामर्थ्य प्रचंड होते. प्रबळ आरमाराच्या जोरावर आपल्या साम्राज्यातील साधनसामग्री व लष्कर जलदीने हिंदुस्थानात आणणे त्यांना शक्य होते.

## ६. बंडवाल्यांच्या नेत्यांत दुऱ्ही होती :-

- राणी लक्ष्मीबाई व तात्या टोपे नेत्यांमधील ऐक्यासारखे काही अपवाद वगळल्यास बंडवाल्यांच्या नेत्यांत फारसे ऐक्य नव्हते.
- दिल्ली जेव्हा इंग्रज फौजांनी वेढली गेली, त्यावेळी कानपूरचे शिपाई दिल्लीच्या बचावास जाण्यास उत्सुक होते. पण असे म्हणतात की, नानासाहेबाने त्यांना दिल्लीकडे जाऊ दिले नाही. कारण नानासाहेब बहादूरशहाचे नेतृत्व अथवा स्वामित्व मानावयास तयार नव्हता.
- दिल्ली बचावली असती, तर बहादूरशहाचा सर्वमान्य नेता म्हणून उदय झाला असता व नानासाहेबास हे नको होते. बंडवाल्यांच्या नेत्यांच्या दुहीसंबंधी आझाद लिहितात, १८५७ च्या घटनेबद्दल जेव्हा मी वाचतो तेव्हा हिंदुस्थानचे राष्ट्रीय चारित्र्य अगदी हीन अवस्थेत पोहोचलेले होते असेच नाईलाजाने म्हणावे लागते. नेत्यांत एकमत होऊ शकत नव्हते. परस्परांबद्दल त्यांना असूया वाटे व ते सतत एकमेकांविरुध्द कारस्थाने करत. खरे म्हणजे त्यांच्यामधील वैयक्तिक हेवेदावेच हिंदी पराभवाला मोठया प्रमाणावर जबाबदार आहेत.'

## ७. हिंदी नेते लष्करी डावपेचांत कमी पडले:-

- १८५७ च्या या उठावात हिंदी बंडवाल्यांचे नेते इंग्रजांशी लढत असता लष्करी डावपेचात कमी पडले. लढाया जिंकण्यासाठी जसे शौर्य, पराक्रमावादी गुण लागतात तसेच डावपेचाचेही गुण आवश्यक असतात.
- बंडवाल्यांनी दिल्ली काबीज केल्यावर ती त्यांनी हरएक प्रयत्न करुन ताब्यात ठेवणे जरुर होते. कारण दिल्ली ही हिंदुस्थानाची पूर्वापार राजधानी या नात्याने तिचा सर्व हिंदुस्थानवर 'मानसशास्त्रीय' प्रभाव होता. हा प्रभाव इंग्रजांनी जाणला होता. म्हणून त्यांनी हरएक प्रयत्ने फौज गोळा करुन दिल्लीचा वेढा निकराने चालविला व ती काबीज केली.
- दिल्लीचा वेढा चालू असता वेढा देऊन बसलेल्या इंग्रज फौजेला पंजाबमधून कुमक पोहोचत असे. ही कुमक बंडवाल्यांना सहज बंद पाडता आली असती, पण त्यांना ते सुचले नाही. तसेच नानासाहेबाने कानपूरकडून चाल करुन दिल्लीच्या सहाय्याला जावयास हवे होते, तेही त्याने केले नाही. तो कानपूरकडेच फिरत राहिलो. हिंदी नेते डावपेचात कमी पडल्याचे उठावातील अनेक उदाहरणे आहेत.

## ८. साधनसामग्री, अनुभव व मनोधैर्य यात इंग्रज वरचढ:-

- इंग्रजांजवळ तारायंत्रे, रेल्वे, पोस्ट या दळणवळणाच्या आधुनिक सोयी होत्या. त्यामुळे लांबलांबच्या बातम्यांची देवाणघेवाण जलदगतीने होऊ शकत होती. स्वाभाविकच इंग्रजी लष्कराच्या हालचाली अचूक व वेळेवर होण्यासाठी त्या साधनांचा मोठा उपयोग झाला.
- दिल्ली, बंडवाल्यांनी काबीज केल्याची वार्ता उत्तर हिंदुस्थानातील प्रमुख इंग्रज ठाण्यांना लगेच समजू शकली होती. त्यामुळे इंग्रजांना जलदगतीने हालचाली करता आल्या. बंदुका, तोफा इत्यादी लष्करी हत्यारांच्या बाबतीतही इंग्रज वरचढ होते. म्हणूनच सर ह्यू रोजची अवघ्या २ हजार सैनिकांची फौज तात्या टोपे याच्या २० हजाराच्या फौजेचा पराभव करु शकली व ११५०० चे सैन्य आत असलेला झाशीचा किल्ला घेऊ शकली.
- सैनिकांच्या ठिकाणी असामान्य मनोधैर्य, शिस्त, आपल्या कार्यावरील अविचल निष्ठा व देशभक्ती असे गुण असल्याशिवाय असे पराक्रम होऊ शकत नाहीत. इंग्रजांकडे असलेले हॅवलॉक, कॅम्बेल, हयू रोज, नील, लॉरेन्स इत्यादी असे अनेक गुणी अधिकारी व सेनानी होते, की ज्यांनी १८५७ च्या अग्निप्रलयात इंग्रजी राज्य आपल्या पराक्रमाच्या व हिंमतीच्या जोरावर वाचविले व मायदेशाची सेवा बजावली.

- राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, कुंवरसिंह, नानासाहेब इत्यांदींनी प्राणाची परवा न करता लढाई केल्या व शौर्य गाजविले. पण इंग्रज सैनिकांच्या ठिकाणी दिसून येणारा युध्द शास्त्रातील तरबेजपणा व रणनीती यांच्या समोर भारतीयांचा टिकाव राहिला नाही.

## ९. उठावास जनतेचा पाठिंबा पाहिजे तसा मिळाला नाही:-

- या उठावात काही ठिकाणी हिंदी जनतेनेही भाग घेतल्याची काही उदाहरणे आहेत. तथापि ज्या प्रमाणात सामान्य हिंदी माणसांनी इंग्रजांविरुध्द त्वेषाने उठाव करावयास हवा होता, त्या प्रमाणावर तो झाला नाही.
- शिक्षित वर्गाने सुद्धा या उठावास अनुकुलता दर्शविली नाही. गुरखा व शीख रेजीमेंट इंग्रजांशी एकनिष्ठ राहिल्यास
- दक्षिणेमधील राजेराजवाडे, जहांगिरदार व सामान्य जनता शांत राहिलीच, पण उत्तरेकडीलही सामान्य जनता तटस्थ राहिली. काही ठिकाणी प्रारंभीचे यश मिळाल्यावर बंडवाल्यांनी आपल्या ताब्यात आलेल्या प्रदेशात स्वत:च लुटालूट सूरु केली. त्यामुळे अशा ठिकाणी उठावास असणारी सामान्य माणसाची सहानुभूती बंडवाले मिळवू शकले नाहीत. उलट काही ठिकाणी इंग्रज फौजातील सैनिकांना हिंदी लोकांनी मार्गात सहाय्य केल्याचे इंग्रज अधिकारी म्हणतात.
- ज. कॅम्बेल म्हणतात, 'दिल्लीहून कानपूरकडे निघालेल्या इंग्रज लष्कराला सामान्य जनतेने खाद्यपेये पुरवून सलोखा दाखविला. ज्या प्रदेशात खुद्द बंडवाल्यांनी अत्याचार केले होते, तेथे इंग्रजांची सरशी होत असल्याचे पाहून, स्थानिक जनतेने बंडवाल्यांना पकडून इंग्रजांच्या स्वाधीन केले अथवा परस्पर ठार मारले'.
- तेव्हा जरी सर्व हिंदुस्थानातील प्रजेची आर्थिक पिळवणूक होत होती, त्यांच्या धर्मावर व समाजावर संकट आल्याची त्याची भावना झाली होती, तरीही ती प्रजा यावेळी इंग्रजांविरुध्द सर्वस्वी उठाव करु शकली नाही.

# १८५७ च्या उठावाचे परिणाम :-

## १. कंपनीची राजवट बरखास्त झाली (इ.स. १८५८ चा कायदा):-



- 'रेग्युलेटिंग ॲक्ट हा कायदा इंग्लिश पार्लमेंटने पास केल्यापासून विलायत सरकारचे कंपनीच्या कारभारावरील नियंत्रण वाढतच गेले होते. १८५३ च्या सनदी कायद्यात 'पार्लमेंटने कंपनीकडून हिंदुस्थानचा राज्यकारभार काढून घेईतोपर्यंत कंपनीने हिंदुस्थानचा कारभार इंग्लंडच्या राणीच्या वतीने पाहावा' असे कलम घालून विलायत सरकारने कंपनीस इशारा दिलेलाच होता.
- आता १८५७ च्या उठावाने विलायत सरकारला चांगली संधी चालून आली. सरकारने १८५८ साली खास करार मंजूर करुन कंपनीची राजवट बरखास्त केली व येथून पुढे हिंदुस्थानात इंग्लंडच्या राणीची राजवट सुरु झाल्याचे घोषित करण्यात आले.
- कंपनीचे सर्व भूदल व आरमार राणी सरकारकडे घेण्यात आले. राणीच्यावतीने हिंदुस्थानचा व्हाईसरॉय हा हिंदुस्थान सरकारचा कारभार पाहणार होता. पूर्वीची 'बोर्ड ऑफ कंट्रोल' व 'बोर्ड ऑफ डायरेक्टर' ही मंडळे बरखास्त करुन त्यांच्या जागी भारत मंत्री आणि त्यांचे मंडळ (The Secretary of State in Council) याची निर्मिती करण्यात आली. हा भारतमंत्री पार्लमेंटचा व ब्रिटिश मंत्रिमंडळाचा सभासद असे.
- 'पिट्स इंडिया ॲक्ट'पासून हिंदुस्थानात निर्माण झालेली 'व्दि-सरकार पध्दती' १८५८ च्या कायद्याने बरखास्त केली. आतापर्यंत ईस्ट इंडिया कंपनीच्या हिंदुस्थानातील कारभाराबद्दल पार्लमेंट अधिक जागृत असे. कंपनीवर दिवसेंदिवस अधिक वर्चस्व गाजविण्याचा पार्लमेंटचा प्रयत्न असे. पण आता हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची सर्वसूत्रे हाती आल्यावर पूर्वीची जागरुकता राहिली नाही. आता तिचे हिंदुस्थानाच्या कारभाराकडे दुर्लक्ष होऊ लागले.

## २. राणीचा जाहीरनामा (राज्यकर्त्यांचे उदार धोरण):-



- १८५७ च्या उठावातून इंग्रज राज्यकर्त्यांनी अनेक धडे घेतले. हिंदुस्थानातील असंतोषाची तीव्र जाणीव त्यांना उठावाने झाली. त्यामुळे त्यांनी हिंदुस्थानविषयक आपले धोरण बदलले. हे धोरण १ नोव्हेंबर १८५८ रोजी अलाहाबाद येथे दरबार भरवून व तेथे राणीचा जाहीरनामा घोषित करुन स्पष्ट केले.
- कंपनी सरकारचा शेवट : ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा राज्य कारभार या उठावामुळे संपुष्टात आला. कारण १८५७ च्या उठावाचा असंतोष कमी करण्यासाठी इंग्रजांना सत्तेत बदल करावा लागला.

### जाहिरनामा असा

'आम्ही आत राज्यवृध्दीच्या उद्योगात हात घालणार नाही, देशी संस्थानिकांचे हक्क, मानमरातब आणि प्रतिष्ठा यांचा आमच्याप्रमाणे मान राखू त्यांनी व आमच्या प्रजेने समृध्दीत राहावे अशीच आमची इच्छा आहे, अंतर्गत शांतता व चांगले सरकार यामुळेच हिंदुस्थानात सामाजिक प्रगती घडून येईल, तसेच आम्ही जाहीर करु इच्छितो की, देशी संस्थानिकांचे कंपनीशी जे करार झाले असतील ते येथून पुढे आम्ही पाळू, संस्थानिकांना आपल्या इच्छेनुसार दत्तक घेता येतील. त्यांची राज्ये विलीन केली जाणार नाहीत. धर्मासाठी कोणावर कृपा किंवा अन्याय केला जाणार नाही. सरकार धर्माच्या बाबतीत ढवळाढवळ करणार नाही. सरकारी नोकऱ्या लायकी पाहून दिल्या जातील. धर्म, वर्ग किंवा जात त्यांच्या मार्गात येणार नाही.

राणीच्या जाहीरनाम्यात अत्यंत उदात्त भावना प्रगट झालेली आहे. हिंदुस्थानात इंग्रज लोककल्याणकारी कारभार करतील. संस्थानिकांना आता इंग्रजांपासून भय बाळगण्याच काही कारण नाही इत्यादी अनेक गोड आश्वासने येथे दिली गेली. राज्यकर्त्यांचे उदार धोरण या जाहीरनाम्यात घोषित करण्यात आले.

## ३. हिंदी लष्कराची पुनर्रचना करण्यात आली :-

- १८५७ चा उठाव प्रथम हिंदी लष्करातच झाला. त्यामुळे इंग्रजांनी या लष्कराची पुनर्रचना करण्याचे काम तातडीने हाती घेतले. लष्करातील इंग्रज सैनिकांशी हिंदी सैनिकांशी असणारे प्रमाण बंगाल प्रांतात १:२ इतके करण्यात आले. (६५००० युरोपीयन सैनिक व १ लाख ४० हजार भारतीय सैनिक) मुंबई प्रांतात १:३ करण्यात आले . पूर्वी हे प्रमाण १:५ असे होते.
- एक हिंदुस्थानातील सर्व महत्वाची ठिकाणे इंग्रज फौजेच्या हाती ठेवण्यात आली. शस्त्रागार व तोफखाना हा इंग्रजी अधिकाऱ्यांच्या हाती ठेवण्यात आला. पूर्वी लष्करी तुकडयात संमिश्र जातीचे सैनिक असत. आता लष्करी तुकडयांची उभारणी जातवार करण्यात आली. पंजाबी, शीख, गुरखा, रजपूत, मराठा यांच्या जातवार रेजिमेंट उभारल्या गेल्या.
- पंडित नेहरु म्हणतात, 'लष्करांमध्ये देशातील विविध गटांची अशी काही व्यवस्था करण्यात आली की, ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची भावना तयारच होऊ नये, इंग्रजांनी या गटांच्या आपल्याला जातीजमातीविषयीच्या निष्ठा वाढीस लावल्या, जमातीच्या घोषणांना प्रोत्साहन दिले.
- जनतेपासून लष्कर दूर ठेवण्याचा हरएक प्रयत्न केला गेला. एवढेच काय सैनिकांच्या हाती वर्तमानपत्रही न पडेल अशी व्यवस्था करण्यात आली.' वरच्या अधिकाराच्या सर्व जागा इंग्रजांकरिता राखून ठेवण्यात आल्या. हिंदी लोकांना फार तर कारकुनाच्या जागा मिळत. परत लष्करी बंड उद्‌भावले तर ते सहजासहजी चिरडून टाकण्याइतकी तयारी इंग्रजांनी हिंदी लष्कराची पुर्नरचना केली.

## ४. संस्थानांसंबंधीच्या आक्रमक धोरणाचा त्याग:-

- ज्यांची राज्ये खालसा झाली, ज्यांचे तनखे गेले, ज्यांच्या पदव्या काढून घेण्यात आल्या असे अनेक हिंदी संस्थानिक १८५७ च्या उठावात सामील झाले आणि त्यांच्यामागे त्यांच्या राज्यातील प्रजाही सहभागी झाल्या.
- या संस्थानिकांची त्यांच्या प्रजेवर अद्यापही चांगली पकड असल्याचे इंग्रजांच्या निदर्शनास आले, तेव्हा हिंदुस्थानवर आपली पकड घट्ट बसविण्यासाठी या संस्थानिकांचा आहे तो दर्जा व अधिकार तसेच ठेवणे हिताचे आहे असे इंग्रजांना वाटले.
- तसेच रशियासारख्या परक्या शत्रूने हिंदुस्थानवर स्वारी केली तर हे संस्थानिके आपणास पुढे मागे सहाय्यकच ठरतील, असेही त्यांना वाटू लागले. परिणामी संस्थानांसंबंधीचे त्यांचे पूर्वीचे आक्रमक धोरण त्यांनी सोडून दिले. आता कोणाही संस्थानिकांचे राज्य विलीन केले जाणार नाही, त्यांना हवा तो दत्तक वारस निवडता येईल, त्यांचे मानमरातब पूर्वीप्रमाणे चालू ठेवण्यात येतील, अशी आश्वासने त्यांनी दिली व पुढे त्यांनी ती पाळली.

## ५. इंग्रजांचे सामाजिक सुधारणांसंबंधीचे धोरण बदलले:-

- कंपनीच्या राजवटीत सतिबंदी, बालविवाह प्रतिबंध, विधवा विवाह संमती यासारखे अनेक समाजसुधारणा घडवून आणणारे कायदे खुद्द कंपनी सरकारने पुढाकार घेऊन केले. याची प्रतिक्रिया मात्र उलटी झाली व हिंदी लोकांना आपल्या धर्मावर व संस्कृतीवर संकट कोसळले आहे असे वाटले. परिणामी त्यातून असंतोष निर्माण झाला.
- आता नव्या राजवटीने असे धोरण ठरविले की येथून पुढे हिंदी समाजाच्या सुधारणेच्या चळवळीस आपण कायदे करुन प्रोत्साहन द्यायचे नाही व असंतोषाचे व रोषाचे धनी व्हायचे नाही. जेव्हा हिंदी समाजालाच आपल्यात सुधारणा व्हावी असे वाटेल, तेव्हा त्या समाजातील समाजसुधारकच ते घडवून आणतील, आपले ते काम नाही.
- पर्सिव्हस स्पिअर म्हणतात, 'सामाजिक सुधारणांशी सुरु असलेला सरकारचा मधुचंद्र संपला आणि सरकारने हिंदी समाजाच्या पारंपरिक समाजव्यवस्थेच्या गाडयाशी जमवून घ्यायचे ठरविले.'

- सरकारने असे धोरण स्वीकारल्यांवर खरोखरच हिंदी समाजात धर्मसुधारणा व समाजसुधारणा चळचळीची लाट उसळली. आर्यसमाज, प्रार्थनासमाज इत्यादी अनेक चळवळी उदयास आल्या. त्यांनी आपल्या प्राचीन संस्कृतीच्या भव्य परंपरेचे पुनरुज्जीवन केलेच शिवाय समाजसुधारणेसाठी हवे असणारे अनुकूल वातावरणही तयार केले.

## ६. हिंदुस्थानचे परराष्ट्रीय धोरण इंग्लंडशी बध्द झाले:-

- नव्या राजवटीने एक अत्यंत महत्वाचा बदल घडवून आणला. तो म्हणजे हिंदुस्थानचे परराष्ट्रीय धोरण, त्याचे भवितव्य, इंग्लंडच्या परराष्ट्रीय धोरणाशी जखडण्यात आले.
- इंग्लंडचा शत्रु तो हिंदुस्थानचाही शत्रू आहे, असे राज्यकर्ते हिंदी लोकांना सांगू लागले. पुढे पहिल्या व दुसऱ्या महायुध्दांत हिंदुस्थान इंग्लंडच्या बाजूने ओढला गेला, तो याच तत्त्वानुसार होय.

## ७. हिंदू-मुसलमानांमधील दरी वाढत गेली:-

- इतिहासात कधीही असे न दिसलेले ऐक्य हिंदू व मुसलमान या दोन धर्मियात १८५७ च्या उठावाने घडवून आणले होते. या वेळी इंग्रजांशी या दोन्ही जाती खांद्याला खादा लावून लढल्या. पण हे ऐक्य पुढे टिकले नाही.
- असे ऐक्य न व्हावे म्हणून यापुढे इंग्रजांनी मोठे प्रयत्न केलेले दिसतात. बंडामध्ये हिंदूपेक्षा मुसलमान अधिक त्वेषाने लढले होते. स्वाभाविकच इंग्रजाचा राग त्यांच्यावर अधिक होता. बंडाचा मोड करताना इंग्रजांनी त्यांच्यावर अधिक दहशत बसविली.
- इंग्रजांनी राज्यकारभारात मुसलमानापेक्षा हिंदूना अधिक जवळ करण्यास सुरुवात केली. परिणामी हिंदू व मुसलमान यांच्यातील दरी रुंदावत गेली.

## ८. इंग्रजांची हिंदुस्थानवरील पकड घट्ट झाली:-

- या उठावातील हिंदी लोकांच्या पाडावामुळे व इंग्रजांच्या विजयामुळे इंग्लंडची हिंदुस्थानावरील पकड घट्ट झाली. आता हिंदुस्थानात सशस्त्र उठाव झाला तरी तो मोडून टाकण्याची सर्व व्यवस्था इंग्रजांनी केलीच.
- इंग्रजांना सशस्त्र विरोध करण्याचे सामर्थ्य अथवा धाडस कोणाही हिंदी राजाजवळ आता राहिले नव्हते आणि तशा प्रकारचा विरोध त्यांनी करावयाचे कारणही आता उरले नव्हते.
- आता हिंदी समाजाचे नेतृत्व सुशिक्षितांकडे जाऊ पाहत होते व हे सुशिक्षित तर इंग्रजी साम्राज्याशी एकनिष्ठ राहू इच्छिणारे व त्यांच्या न्याय बुध्दीवर विश्वास ठेवणारे होते. सारांश, इंग्रजी साम्राज्यसत्तेला आता हिंदुस्थानात कोणताही मोठा धोका उरला नव्हता.

## ९. इंग्रजी राजवटीबद्दल दहशत व तिरस्कार:-


- बंडाचा मोड करत असता कंपनीच्या लष्करी अधिकाऱ्यांनी शिपायांना तर ठार केलेच, शिवाय हजारो निरपराधी स्त्री-पुरुषांचीही त्यांनी कत्तल केली. त्यातून वृध्द व बालकेही सुटली नाहीत. एकूण १ लाख माणसांना फाशी देण्यात आली इंग्रजांच्या क्रूरतेस यावेळी काही पारावार राहिला नाही.
- याचा परिणाम हिंदी लोकांच्या मनावर झाला. त्यांनी इंग्रजांबद्दल दहशत घेतली. हिंदी लोकांनी पुढे-मागे असे बंड करु नये, हे इंग्रजांचेच उद्दिष्ट त्यांच्या या क्रूर कृत्याने कदाचित साध्य झाले असेल, पण त्यांच्या हिंदुस्थानातील राजवटीला कलंक लागला.
- हिंदी लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल तिरस्कार निर्माण झाला. १८५७ च्या क्रूरतेचे
- व्रण ते विसरले नाहीत, त्यांच्यातूनच पुढे इंग्रजी राजवट उलथून पाडू इच्छिणाऱ्या सशस्त्र क्रांतिकारकांच्या संघटनांचा जन्म झाला. या क्रांतिकारकांनी इंग्रजाबद्दल व्देष, शत्रुत्व व स्वदेशाबद्दल प्रेम निर्माण करण्याचा मोठा प्रयत्न केला.

## १०. उठावापासून हिंदी लोकानी घेतलेला धडा:-

- या उठावापासून इंग्रजांनी जसे काही धडे घेतले तसे ते हिंदी लोकांनीही घेतले. सरजामी पध्दतीचा उठाव करुन व पारंपरिक हत्यारांनी लढून आता इंग्रजी राज्य नष्ट होणार नाही याची त्यांना जाणीव झाली.
- नानासाहेब अथवा झाशीची राणी आता आपले नेतृत्व करु शकणार नाही, जो काळ आता इतिहासजमा झाला, नवा काळ सुरु झाला असून नव्या काळात इंग्रज साम्राज्यावाद्यांशी लढण्याची नवी हत्यारे, नवी साधने आपण शोधली पाहिजेत, याची जाणीव हिंदी विचारवंतांना झाली.
- आपण राजेशाही अथवा सरंजामशाही यांच्या पुनरुज्जीवनासाठी न धडपडता, स्वातंत्र्य, लोकशाही व व्यक्तिस्वातंत्र्य या नव्या युगाच्या हक्कांसाठी संघर्ष केला पाहिजे, ही जाणीव नव्यानेच उदयास आलेल्या इंग्रजी शिक्षण घेतलेल्या वर्गामध्ये निर्माण झाली. या नव्या जाणिवेतून पुढे राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ उभी राहिली.

## ➢ १८५७ चा महाराष्ट्रातील उठाव :-

- ब्रिटिश राजवटीमधील सर्वांत मोठा उठाव म्हणून इ. स. १८५७ च्या उठावाकडे पाहिले जाते.
- स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर त्यास 'पहिले स्वातंत्र्यसमर' म्हणून संबोधतात.
- इतिहासकार न. र. फाटक यांस 'शिपायांची भाऊगर्दी' म्हणून संबोधतात.
- पं. जवाहरलाल नेहरु यांनी भारताचा शोध (Discovery of India) या पुस्तकात १८५७ चा उठाव स्वातंत्र्य युद्धाचे मुल्य होते. असे म्हटले आहे.
- या उठावाने महाराष्ट्रातील जनतेला इंग्रजी सत्तेच्या विरुध्द पेटून उठण्यास भाग पाडले. त्यामध्ये काहींनी सशस्त्र उठाव केले तर काहींनी शाब्दिक असंतोष प्रगट केला.




वरील नकाशात महाराष्ट्रातील उठावाची ठिकाणे + अशा चिन्हाने दाखविण्यात आली आहेत.

## ➢ १८५७ च्या उठावाबद्दल इतिहासकारांची मते :-

- **स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर** हे १८५७ च्या उठावाला 'भारताचे पहिले स्वातंत्र्ययुध्द' असे म्हटले आहे.
- **अशोक मेहता** – 'हे बंड शिपायांच्या बंडाहून मोठे होते, मर्यादित प्रमाणात का होईना, पण राष्ट्रीय उठावाच्या स्वरुपाचे होते.'
- **संतोषकुमार रे** - 'हिंदु आणि मुस्लीम यांनी घडवून आणलेली क्रांती होती. पुढे तिने जनतेच्या बंडाचे आणि स्वातंत्र्ययुध्दाचे रुप धारण केले.
- **न. र. फाटक** – '१८५७ चा उठाव म्हणजे शिपायांची गर्दी होती.'
- **जनरल कॅम्पबेल** – 'हे निर्भेळ शिपायांचे बंड होते, त्यातही मुख्यत्वे बंगाल लष्करातील शिपायांचे'
- **किशोरचंद्र मित्रा** – 'एक लाख शिपायांचे हे बंड होते. जनतेच्या सहभागाचा त्याच्याशी संबंध नव्हता.'
- **आर. सी. मुजूमदार** – '१८५७ चे बंड राष्ट्रीय चळवळ नव्हती. बंडाचे नेते भारतीय राष्ट्रभावनेने प्रेरित झालेले नव्हते.'

- **डॉ. ईश्वरीप्रसाद** – 'कंपनी राजवट नष्ट करण्याचे व परकिय जोखंडापासून स्वातंत्र्य मिळविण्याचे उद्दिष्टये असलेले उत्तरेकडील बंड'
- **मौलाना आझाद** – १८५७ चा उठाव सुसूत्र योजनेतून निर्माण झाला नव्हता अथवा त्यामागे एखादा हुकूमी नेताही नव्हता.
- **थॉम्सन गॅरेट** - हे अत्यंत स्थानिक, मर्यादित व असंघटीत स्वरुपाचे बंड होते.
- **त्र्यं. र. देवगिरीकर** – 'या युध्दापासून काय शिकण्यासारखे आहे? एकच गोष्ट शिकण्यासारखी होती, ती म्हणजे कत्तली करुन धर्मरक्षण होत नाही. त्याचे रक्षण करायला निराळेच अंत:करणाचे गुण लागतात.' शस्त्राच्या बळाने इंग्रजांचे राज्य नष्ट करण्याच्या भरीला न पडता, त्यांची विद्या संपादन करुन 'आपण त्यांच्यासारखे होऊनच' आपली प्रगती साधता येईल, हा धडा हिंदी लोकांनी या उठावातून घेतला.
- **लॉर्ड कॅनिंग** - "If the Sindhia Joins the mutiny I shall have to pack of tomorrow" या शब्दांत भारतीयांची राष्ट्रीय अस्मिता जागृत केली.

## ➢ १८५७ च्या संबंधी प्रसिद्ध पुस्तके

१) The Causes of Indian Munity - सर सैय्यद अहमद खान
२) १८५७ चे स्वातंत्र्य समर - स्वा. विनायक दामोदर सावरकर
३) The Spoy mutiny and revolution - आर. सी. मुझुमदार
४) The great Rebelean - अशोक मेहता

★★★★★★★★★★★★★★★★★★★★